गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचे तत्त्वज्ञान -एक चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत तत्त्वज्ञान विषयातील (Ph. D.) पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

संशोधक

अलका रविंद्र जावळीकर

मार्गदर्शक

डॉ. आंबटकर वृषाली ओंकार

गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचे तत्त्वज्ञान- एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना

शिक्षण हे मानवी जीवनाचे प्रमुख अंग आहे. मानवी जीवनाचे प्रमुख वैशिष्ट्ये जसे अन्न वस्त्र व निवारा ह्या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. त्याचप्रमाणे शिक्षणामुळे माणूस हा पशुंपेक्षा सरस ठरतो. शिक्षण म्हणजे केवळ लिहिणे वाचता येणे एवढेच नाही तर आंतरिक अध्यात्मिक व मानसिक दृष्टीने परिपूर्ण होणे होय. माणसातील मनुष्यत्वाच्या साच्याने देवत्व प्राप्त करून घेण्याचे साधन म्हणजे शिक्षण होय.

मग तत्वज्ञान म्हणजे काय असा प्रश्न निर्माण होतो. केवळ भौतिक प्रगती म्हणजे पूर्णत्व नव्हे तर या विषयातील प्रत्येक गोष्टींचा वापर कधी केव्हा कसा करावा हे सांगणारे नैतिक नियम ज्याच्या आधारेच आपण भौतिक सुखांची व वस्तूंचा उपभोग करून परमात्म्याशी एकरूप होण्याचा प्रयत्न करतो.

भारतीय संस्कृतीचा पायाच मुळात नैतिक तत्त्वांवर आधारित असल्याने प्राचीन वेद पुराण इत्यादी मानवाने भौतिक व आध्यात्मिक जीवनाची सांगड कशी घालावी याचे सुंदर मार्गदर्शन केलेले आहे. ज्याची आज जास्त गरज मानवाला निर्माण झालेली आहे. प्राचीन गुरुकुल पद्धतीतून श्रुती पुरानातून मानव व निसर्गाचे नाते अतूट होते. निसर्गाचे विविध रीतीने पूजा करून त्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जात होती. विविध रूढी परंपरा आजही आपल्याला वृक्ष संवर्धन पाण्याची बचत गरजेपुरतेच नैसर्गिक संसाधनाचा नैसर्गिक साधनांचा वापर करून आपले जीवन व मानवी जीवन सुखी करीत असते.

कुटुंब व्यवस्था असो की शिक्षण व्यवस्था प्रत्येक गोष्ट शिस्तबद्ध पद्धतीने केली जाते. म्हणजेच पूर्वी मानवी मी गरजा या मर्यादित होत्या. परंतु मध्ययुगीन कालखंडापासून मानवी जीवन हे एका अंधकार युगात गेले.

वैज्ञानिक क्रांतीने मानवाचे जीवन सुखी झाले. पण खऱ्या मानवी नैतिक मूल्यांचे पायमल्ली झाली. परिणामी शिक्षण व नैतिकता या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून शिक्षण हे क्रियाशील तर तत्त्वज्ञान हे सिद्धांतिक होय. या दोन्हींचा जेव्हा समतोल बिघडला जातो तेव्हाच मानवी जीवनाचे आदपतन होऊ लागते.

रवींद्रनाथ टागोर यांचा परिचय

अतिशय सुसंस्कृत श्रीमंत व कुलीन घराण्यात जन्म झाला. रवींद्रनाथाच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे मूळ त्यांच्या बालपणीच्या शिक्षणविषयक अनुभवात मिळते त्यांनी कोणतीही उच्च पदवी प्राप्त केली नाही. कारण चार खोल्यांच्या बंदिस्त वातावरणात मिळणाऱ्या शिक्षणात ते कधीच रमले नाहीत. तत्त्वज्ञानाचा वारसा त्यांना त्यांच्या वडिलांकडून मिळाला होता. संगीत नृत्य चित्र अभिनय अशा कलांचा वारसा त्यांना त्यांच्या भावांकडून मिळाला होता. ते भारतीय संस्कृतीचे गाडी उपासक होते.

त्यांच्या मते शिक्षणाचे ध्येय व जीवनाचे ध्येय एकच असले पाहिजे कारण शिक्षणाने केवळ नोकरी करून उदरनिर्वाह चालविणे हे त्यांना मान्य नव्हते जीवनाचे अंतिम ध्येय हे संपूर्ण विकास व मुक्ती हेच आहे असे ते मानतो होते. रवींद्रनाथ हे अध्यात्मवादी विचारवंत म्हणून ओळखले जातात शिक्षणाद्वारे आत्म्याचा विकास होतो. मानवतावादी मूल्य ही पूर्णपणे नष्ट होऊ शकत नाहीत. काही कारणास्तव मर्यादित काळापुरते झाकाळली जाऊ शकतात साहित्य कलेद्वारे उच्चतम ध्येयाची निर्मिती करून मानवाला सर्वश्रेष्ठ बनवू शकतात त्यावर त्यांचा असीम विश्वास होता.

रवींद्रनाथांच्या मते शिक्षणाची काही मूळ उद्दिष्टे आहेत. ती पुढील प्रमाणे

१. मानसिक व शारीरिक शक्तींचा विकास करणे.

२. सांस्कृतिक पुनर्जीवन करणे .

३. मानसिक दडपण नाहीसे करून कृत्रिमतेचा त्याग करणे .

४. भारताच्या विकासासाठी राष्ट्रीय पद्धतीचे शिक्षण प्रदान करणे.

अभ्यासक्रमासंबंधी बोलताना ते म्हणतात की निसर्गाच्या मदतीने जेवढा शक्य होईल तेवढा अभ्यासक्रम राबविला पाहिजे चार आश्रम व्यवस्थेतील ब्र्ह्मचर्य गृहस्थाश्रम वानप्रस्थ आश्रम व संन्यास यात मानवी जीवनाचे सार्थकता आहे म्हणून विद्यार्थ्यांनी गुरुकुलातही शिक्षण संपेपर्यंत ब्र्ह्मचर्याचे पालन केले पाहिजे तसेच आजच्या विद्यार्थ्यांनीही ब्र्ह्मचर्याचे पालन केले पाहिजे असे रवींद्रनाथांचे स्पष्ट मत होते. खुल्या आकाशात घेतलेले शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासास पोषक असते शिक्षण संस्थेत प्राचीन तपोवनप्रमाणे ग्रामीण वातावरण असावे परंतु शिक्षण तंत्राचे विचार मात्र आधुनिक असावयास हवेत.

शाळेतील टेबल खुर्च्या बाकी यांची मागणी करणे म्हणजे खऱ्या गरजेपेक्षा पाश्चात्य राहण्यांचे आंधळे अनुकरण करणे होय.

साहित्यकार व चित्रकार म्हणून रवींद्रनाथांनी जगाला जगाला एक दीपस्तंभ प्रमाणे मार्गदर्शन करणारी कलाकृती निर्माण केली. चित्रकारिता शिकण्यासाठी त्यांनी रविंद्रनाथाच्या बेंगाल स्कूल ऑफ पेंटिंग मध्ये शिक्षण घेतले. आपल्या गीतांना चाली लावण्यात रवींद्रनाथ अतिशय माहीर होते.

अशा तऱ्हेने चित्रकला काव्य लेखन संगीत अशा सर्व क्षेत्रात रवींद्रनाथांचे कसब पहावयास मिळते. माणसाचे स्वातंर्त्य हेच शिक्षणाचा मुख्य आधार मूल्य आहे. शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास व्हावा असेच त्यांचे मत होते. वर्तमान शिक्षणातून माणूस स्वार्थी व मानसिक दृष्ट्या फारच उद्विग्ध झालेला आहे.

भौतिक प्रगती ही कितीही झाली तरी शेवटी अध्यात्मिक शांती हीच मानवासाठी आवश्यक असते. रवींद्रनाथाचे विचार त्याकाळी अत्यंत क्रांतिकारी वाटत असले तरी त्यांच्या विचारांची खरी गरज आज कळत आहे. कारण प्रचलित

शिक्षण व्यवस्था आहे निरर्थक असून शिक्षण क्षेत्रात जीव नवी वैचारिक क्रांती आणली जात आहे. शिक्षणाला कलेला जो नवा मार्ग दाखविला ते जाणून घेण्यासाठी प्रस्तुत विषयावरील संशोधन कार्य महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टे Objectives Of Research

प्रस्तुत शोध प्रबंधातील श्री रवींद्रनाथ टागोरांच्या समग्र साहित्य संगीत शिक्षण विषयक विचारांचा शोध घेताना शोध घेताना खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. प्राचीन काळातील शिक्षणपध्दती समजून घेवून शिक्षण संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करणे.

२. वर्तमान परिस्थितीत रवींद्रनाथ टागोर यांचे जे विचार आहेत त्यांचे महत्त्व पटवून देणे.

३. साहित्याच्या माध्यमातून समाज परिवर्तन करण्याचा प्रयत्न करणे.

४. गीतांजली मधील जीवनविषयक तत्त्वज्ञान स्पष्ट करणे.

५. गुरुवर्य रवींद्रनाथ टागोरांच्या दृष्टिकोनातून शिक्षणाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करणे.

६. रवींद्रनाथ टागोर यांच्या भारतीय संस्कृती व तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

७. गुरुवर्य रवींद्रनाथाच्या दृष्टिकोनातून शैक्षणिक तत्त्वज्ञानाची भूमिका व महत्त्व स्पष्ट करणे.

८. गुरुवर्य रवींद्रनाथांना आपल्या विचारात द्वारे शिक्षणात कोणती क्रांती अपेक्षित होती याचा शोध घेणे .

९. वर्तमान काळात टागोरांच्या विचारांचे उपयुक्तता पडताळून पाहणे भावी पिढ्यांसाठी टागोरांनी सांगितलेली नैतिक तत्वे याचा अभ्यास करणे.

सिद्धांत कल्पना

शिक्षणपद्धती तसेच रवींद्रनाथांचे साहित्य संगीत काव्य त्यांचा अभ्यास करण्यासाठी काही गृहीतके मांडली आहेत. ती पुढील प्रमाणे-

१. शिक्षण तज्ञ म्हणून टागोरांची विचार पद्धती वर्तमान काळात उपयुक्त असल्याचे दिसून येते.

२. साहित्यकार संगीतकार उत्कृष्ट कवी म्हणून त्यांनी निर्माण केलेल्या कलाकृती एक मार्गदर्शक ठरतात .

३. टागोरांचा निसर्वादी दृष्टिकोन अतिशय व्यापक स्वरूपाचा आहे .

४. रवींद्रनाथ टागोर हे भारताचे अध्यात्मिक अग्रदूत असल्याचे दिसून येते.

गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर यांची एक कवी म्हणून जगभर ख्याती आहे साहित्य क्षेत्रात रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्याचा अभ्यास झालेला आहे. परंतु तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात अत्यंत मर्यादित स्वरूपात त्यांच्या विचारांचा अभ्यास झालेला आहे. त्यांच्या साहित्यातील तात्विक शैक्षणिक सामाजिक विचारांचा अभ्यास व्हावा या दृष्टीने प्रस्तुत प्रबंधाची सिद्धांत कल्पना पुढीलप्रमाणे सांगता येईल.

“रविंद्रनाथ टागोर यांचे विचार विचार वर्तमान स्थितीमध्ये अत्यंत मार्गदर्शन व उपयुक्त ठरणारे असावेत.”

संशोधन पद्धती

प्रस्तुत विषयाच्या संदर्भात संशोधन करीत असताना विश्लेषणात्मक,

वर्णनात्मक व तुलनात्मक पद्धतीचा वापर केला जाणार आहे. अशा पद्धतीद्वारे संशोधन करण्याचे कार्य केले जाणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये केवळ रवींद्रनाथ टागोरांचे समग्र तत्त्वज्ञान साहित्य कला राष्ट्रविषयक विचार धार्मिक व शैक्षणिक विचार या विषयाशीच मर्यादित स्वरूपाची असेल तसेच प्रस्तुत प्रबंधामध्ये प्राचीन मध्ययुगीन तसेच समकालीन विचारवंताच्या विचारांचा तुलनात्मक अभ्यास गरजेनुसारच करण्यात येईल.

संशोधन विषयाचे महत्व

गुरूवर्य रवींद्रनाथ टागोर हे एखाद्या दीपस्तंभ प्रमाणे आपल्या जीवनाला मार्गदर्शन करत आहेत. त्यांची शिक्षण विषयक संकल्पना आहे अतिशय महत्वपूर्ण आहे. त्यांचे शैक्षणिक विचार हे शिक्षक विद्यार्थी शाळा महाविद्यालय समाज राष्ट्र व संपूर्ण जगासाठी प्रेरणा देणारे आहेत.

आज शैक्षणिक संस्थांचे जाळे सर्वत्र देशभर पसरलेले आहे परंतु शिक्षणातून आत्म्याचा विकास ही संकल्पना रवींद्रनाथांनी मांडलेली आहे. परंतु आज शाळा या सर्वांगीण विकासाऐवजी विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षा झालेली आहे. शिक्षण व दैनंदिन जीवन यांचा कोठेही संबंध दिसत नाही, औपचारिक शिक्षण पद्धती मुलांचे मानसिक खच्चीकरण होत आहे, शिक्षणातून साक्षर झाले, पण सुसंस्कृत समाज निर्माण होताना दिसत नाही. त्यामुळे सध्या परिस्थितीत बदल घडवून आणणे गरजेचे आहे. संगीत कला साहित्याची जाण आजच्या नवीन पिढीला होता ना दिसत नाही. त्यासाठी अनावश्यक दिखाऊपणा व्यवहार शून्य शिक्षण पद्धतीत बदल करणे गरजेचे आहे. रवींद्रनाथांच्या विचारांचा आज आपण स्वीकार केला तर नवीन पिढी द्वेष मत्सर लोभिवृत्ती स्वार्थीपणा इत्यादी अवगुण नष्ट होऊन गुरूकुल

पद्धतीच्या माध्यमातून समाजाला आत्मनिर्भर स्वावलंबी व कर्तव्यवान पिढी निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल. अध्यात्म तत्त्वज्ञान विज्ञान यांचा या योग्य समन्वय साधता आल्या तर निश्चितच पूर्वीच्या तक्षशिला नालंदा विद्यापीठासारखे नवीन विश्वविद्यालय निर्माण होऊन भारतीय संस्कृतीची महानता पुन्हा एकदा जगासमोर आणता येईल. आणि म्हणूनच गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर यांचे विचार किती महत्वपूर्ण आहेत हेच या संशोधनाचे उद्दिष्ट साध्य होईल.

प्रकरणाची रूपरेषा

१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन पद्धती संशोधनाचे महत्त्व संशोधनाची उद्दिष्ट यांचा आढावा घेण्यात येईल. तसेच रवींद्रनाथ टागोर यांच्या जीवन चरित्राचा थोडक्यात आढावा घेण्यात येईल.

२ रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्यातील तत्त्वज्ञान

गीतांजली मधील तत्त्वज्ञान, साहित्यातील सौंदर्य, नीति विचार, स्त्री विषयक विचार, साहित्यातील राष्ट्रविषयक विचार.

३ रवींद्रनाथ टागोर यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान

औपचारिक व अनौपचारिक शिक्षण, निसर्गवादी विचार, शांतिनिकेतन, शिक्षणाचे विकेंद्रीकरण.

४ रवींद्रनाथ यांचे धार्मिक तत्त्वज्ञान

कर्मयोग, धर्माचा अधिकार, पवित्रता, कर्त्याच्या इच्छेने कर्म, जगतचे स्वरूप, मानव विषयक विचार.

५ निष्कर्ष

संदर्भ

१. चौधुरी नाथ, शिक्षा का विस्तार तथा अन्य निबंध, सस्ता साहित्य मंडल प्रकाशन, नोएडा

२. दायमा (सं) , बदलते भारतीय शिक्षण, अर्थकारण व समाजकारण, अथर्व प्रकाशन, लातूर

३. पाटील महेंद्र, पाटील महेंद्र, भारतीय राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१९

४. फडके गंगाधरशास्त्री, हिंदू धर्मत्व, पुणे, १८५२

५. भारतीय डॉ. भवानी लाल, नवजागरण के पुरोधा महर्षी दयानंद सरस्वती

६. भोळे भास्कर लक्ष्मण, आधुनिक भारतातील राजकीय विचार,कॉन्टिनेन्टज प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती, १९७८

७. प्रा. घोटाळे रा.ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्त्व आणि पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नवी रामदास पेठ, नागपूर

८. प्रा. अशोक चौसाळकर संपादित, विचारवंत आणि समाज प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार गौरवग्रंथ, द युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन, पुणे, २०१५

९. पंथम, डॉयच्च, आधुनिक भारतातील राजकीय विचार, सेज प्रकाशन, नई दिल्ली,

१०. पाटील वा.भा., संशोधन पध्दती, रंगराव पाटील प्रकाशन,पुणे, २००३

११. मेश्राम, सामाजिक संशोधन प्रक्रिया, नई दिल्ली, २०००

१२. डॉ. सुनिल जाधव, सामाजिक संशोधन पध्दती, अरुणा प्रकाशन, लातूर, २०१२

१३. आधुनिक भारताचे निर्माता रवींद्रनाथ टागोर हिरण्य बॅनर्जी अनुवादक मृणालिनी केळकर

१४. डॉ. ब बा कुडले शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक मानसशाळा

१५. डॉ. नरेंद्र जाधव रवींद्रनाथ टागोर युग निर्माता

१६. शंकर बालाजी शहाणे निबंध माला खंड-एक रवींद्रनाथ ठाकूर

संशोधक

अलका रविंद्र जावळीकर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आंबटकर वृषाली

एल.जी. बी. एस. कॉलेज, पुर्णा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत तत्त्वज्ञान विषयातील पीएच्.डी. (Ph.D.)

पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचे तत्त्वज्ञान एक चिकित्सक अभ्यास

संशोधकाचे नाव - अलका रविंद्र जावळीकर

विषय - तत्त्वज्ञान

मोबाईल नंबर - 9156016266

प्रवर्ग - (हिंदु)

पत्ता - त्रिनेत्र ॲपार्टमेंट, प्लॉट न. ६, सौभाग्यनगर, शिवाजी शाळेच्या पाठीमागे, लातूर-४१३५१२

ई .डी.मेल आय- - alkachikhurdekar40@gmail.com

मार्गदर्शकाचे नाव - डॉ. आंबटकर वृषाली

महाविद्यालयाचे नाव - तत्त्वज्ञान विभाग,
एल.जी. बी. एस. कॉलेज, पुर्णा

मोबाईल नंबर - 9119523356

ई .डी.मेल आय- -